गुरुवार दि. २३ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३२२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जिवेश्वहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालन्यात २५ झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड देण्याचा निर्णय

## प्रशासन खडबडून जागे; नूतन वसाहत व राहुल नगरमधील पात्र लाभार्थ्यांना लवकरच वितरण, उर्वरित प्रक्रियेलाही वेग

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील झोपडपट्टीधारकांच्या प्रलंबित पीआर कार्ड प्रश्नावर दैनिक युवा आदर्शने २ जुलै २०२६ रोजी प्रकाशित केलेल्या वृत्ताचा सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. वृत्तामध्ये पात्र लाभार्थ्यांना तातडीने पीआर कार्ड देण्याची गरज, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे निर्माण झालेली अनिश्चितता आणि टप्प्याटप्प्याने वितरण सुरू केल्यास संपूर्ण प्रक्रियेला गती मिळेल, हा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला होता. त्यानंतर प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत पहिल्या टप्प्यात २५ पात्र झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयानुसार नूतन वसाहत आणि राहुल नगर परिसरातील पात्र लाभार्थ्यांना लवकरच आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष कार्यक्रमात पीआर कार्डांचे वितरण करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून मालकी हक्काच्या प्रतीक्षेत असलेल्या झोपडपट्टीधारकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

२ जुलै रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तात जालना शहरातील १४ झोपडपट्ट्यांमध्ये सुरू असलेल्या च्या सर्वेक्षणाची माहिती देताना, पात्र ठरलेल्या नागरिकांना तातडीने पीआर कार्ड वितरित करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली होती. सर्वेक्षण पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना आणखी प्रतीक्षा करायला लावणे योग्य नसल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले होते.

याशिवाय, टप्प्याटप्प्याने पीआर कार्ड वाटप सुरू झाल्यास उर्वरित झोपडपट्टीधारकही मालमत्ता कर भरून आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी पुढे येतील आणि त्यामुळे महानगरपालिकेच्या महसुलातही वाढ होईल, हा महत्त्वाचा मुद्दाही मांडण्यात आला होता.

**प्रशासनाने घेतला सकारात्मक निर्णय**

वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित प्रशासकीय स्तरावर हालचालींना वेग आला. पात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम करण्याची प्रक्रिया गतीमान करण्यात आली असून पहिल्या टप्प्यात २५ झोपडपट्टीधारकांना पीआर कार्ड देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या लाभार्थ्यांना



### जालन्यात झोपडपट्टीधारकांच्या पीआर कार्ड प्रक्रियेला वेग; १४ झोपडपट्ट्यांमधील घरांचा सर्वेक्षण अंतिम टप्प्यात

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या पीआर कार्ड प्रक्रियेला वेग आला असून, या संस्थेमार्फत शहरातील १४ झोपडपट्ट्यांमध्ये व्यापक सर्वेक्षण सुरू आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत सुमारे ६६ हेक्टर क्षेत्रातील ६,७४३ घरांची नोंदणी व पडताळणी केली जात असून, रहिवाशांकडून आवश्यक कागदपत्रे संकलित करण्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १४ पैकी ११ झोपडपट्ट्यांमध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. संबंधित झोपडपट्टीधारकांकडून वास्तव्याचे पुरावे, महानगरपालिकेच्या मालमत्ता कराच्या पावत्या, ओळखपत्रे तसेच शासनाने आवश्यक ठरविलेली इतर कागदपत्रे स्वीकारून त्यांचे डिजिटल नोंदणीकरण (ऑनलाइन अपलोड) करण्यात येत आहे.

**कागदपत्र संकलन आणि ऑनलाइन प्रक्रिया सुरू**

च्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत सुमारे एक हजार नागरिकांची कागदपत्रे जमा करून ती ऑनलाइन प्रणालीमध्ये अपलोड करण्यात आली आहेत. प्राथमिक पडताळणीनंतर त्यापैकी अंदाजे ४०० ते ४५० झोपडपट्टीधारक पीआर कार्डसाठी पात्र ठरत असल्याचे समोर आले आहे. मात्र, हा आकडा पुढील पडताळणी आणि उर्वरित कागदपत्रांच्या तपासणीनंतर वाढण्याची शक्यता असल्याचेही सांगितले जात आहे.

अनेक (पान २ वर)

लवकरच एका अधिकृत कार्यक्रमात पीआर कार्डांचे वितरण केले जाणार असून त्यानंतर टप्प्याटप्प्याने इतर पात्र लाभार्थ्यांनाही पीआर कार्ड देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

**कागदपत्र संकलनालाही मिळाली चालना**

प्रशासनाच्या या निर्णयामुळे झोपडपट्टीधारकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होणार आहे. प्रत्यक्ष पीआर कार्ड वितरण सुरू होत असल्याचे पाहून अनेक नागरिकांनी मालमत्ता कर भरणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे आणि सर्वेक्षण प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी पुढाकार घेतील. यामुळे मार्फत सुरू असलेल्या कागदपत्र पडताळणी, ऑनलाइन नोंदणी आणि इतर शासकीय प्रक्रियांनाही अधिक वेग मिळणार आहे.

**हजारो कुटुंबांसाठी आशेचा किरण**

जालना शहरातील हजारो झोपडपट्टीधारकांसाठी पीआर कार्ड म्हणजे केवळ एक कागदपत्र नसून मालकी हक्काचा अधिकृत पुरावा, शासकीय योजनांचा लाभ, आर्थिक सुरक्षितता आणि भविष्यातील विकासाच्या संधींचे दार आहे.पहिल्या टप्प्यातील २५ लाभार्थ्यांना पीआर कार्ड देण्याचा निर्णय हा उर्वरित पात्र झोपडपट्टीधारकांसाठी आशादायी ठरणार असून, आगामी काळात सर्व पात्र लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने पीआर कार्ड मिळण्याचा मार्ग अधिक मोकळा झाला आहे.आता पहिल्या टप्प्यानंतर उर्वरित पात्र लाभार्थ्यांनाही लवकरात लवकर पीआर कार्ड मिळावेत आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ही प्रक्रिया पूर्णत्वास जावी.

# राहुल गांधींच्या आंदोलनाचा जालन्यात निषेध

**✻काँग्रेस कार्यालयासमोर भाजप जालना महानगरचे जोरदार शक्तिप्रदर्शन**
**✻पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन करणे लोकशाही चा अवमान- माजी आ.कैलास गोरंटयाल**
**✻लोकशाहीच्या नावाखाली अराजकता पसरविण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही भास्कर आबा दानवे**

**जालना- प्रतिनिधी**

दिल्लीत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या शासकीय निवासस्थान परिसरात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या आंदोलनाच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्ष, जालना महानगरच्या वतीने आज (दि.२२) काँग्रेस खासदार डॉ.



कल्याण काळे यांच्या कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या कृतीचा निषेध करत घोषणाबाजी केली. यावेळी माजी आमदार कैलास गोरंटयाल म्हणाले की, पंतप्रधानांच्या शासकीय निवासस्थान परिसरात आंदोलन करणे ही संसदीय परंपरा, घटनात्मक मूल्ये आणि लोकशाही संस्थांचा अवमान करणारी कृती असून, अशा प्रकारच्या राजकारणामुळे देशाच्या लोकशाही व्यवस्थेला धक्का (पान २ वर)

# जालना जिल्ह्यातील स्वयंचलित हवामान केंद्रांशी छेडछाड करणाऱ्यांवर होणार कठोर कारवाई

## संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने प्रशासनाला कळविण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात कार्यरत असलेल्या स्वयंचलित हवामान केंद्रांवर ( -) अज्ञात व्यक्तींनी छेडछाड केल्याच्या घटना निदर्शनास आल्याने जिल्हा प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. हवामान विषयक माहितीच्या अचूकतेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधित व्यक्तींविरुद्ध प्रचलित कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिला आहे.

जिल्ह्यातील स्वयंचलित हवामान केंद्रांद्वारे तापमान, पर्जन्यमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग व दिशा यासारखी महत्त्वपूर्ण हवामान विषयक माहिती संकलित केली जाते. या माहितीचा उपयोग शेतकऱ्यांना हवामानावर आधारित कृषी सल्ला देण्यासाठी, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, हवामान अंदाज तसेच विविध शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केला जातो. त्यामुळे या केंद्रांशी कोणत्याही (पान २ वर)

# एसआयआर अभियानात आ. अर्जुनराव खोतकरांचा सहभाग; नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

## मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी जनतेनी आपल्या कुटुंबासह, नातेवाईक व मित्रांनाही सहभागी करून घेण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार, शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनरावजी खोतकर✻ यांनी सध्या सुरू असलेल्यामतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अभियानात सहभाग नोंदवून स्वतः माणिक राठोड यांच्याकडून परिवारासह एसआयआर प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी त्यांनी मतदारसंघातील सर्व पात्र नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन मतदार यादी अद्ययावत



करून घ्यावी, असे आवाहन केले. आ. खोतकर म्हणाले की, मतदार यादी अचूक आणि अद्ययावत असणे ही सक्षम लोकशाहीची मूलभूत गरज आहे. प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या नावाची नोंद, दुरुस्ती किंवा आवश्यक बदल वेळेत करून घेणे आवश्यक आहे. भारत निवडणूक आयोगामार्फत राबविण्यात येत असलेल्या या विशेष अभियानाचा प्रत्येक नागरिकाने लाभ घ्यावा.यावेळी त्यांनी नागरिकांना आपल्या कुटुंबातील सर्व पात्र मतदार, नातेवाईक, मित्रपरिवार आणि शेजाऱ्यांनाही या अभियानाची माहिती देऊन एसआयआर प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक मतदाराची अचूक नोंद महत्त्वाची (पान २ वर)

# अजितदादांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार; ९१० रुग्णांची मोफत नेत्रतपासणी

## स्व. अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्त आरोग्य शिबिर

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी आयुष्यभर सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून केलेले काम आणि दिलेली जनसेवेची शिकवण कायम स्मरणात ठेवून त्याच मार्गाने कार्य करत राहू, असा निर्धार मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी व्यक्त केला. स्व. अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्त बाजीराव पाटील चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, श्री गणपती नेत्रालय आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने



धारकल्याण (ता. जालना) येथील सदानंद महाराज मठात आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व चष्मे वाटप शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक सेलचे प्रदेशाध्यक्ष नाझेर काझी, भटके विमुक्त सेलचे प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड, शहर जिल्हाध्यक्ष शेख महमूद, शकुंतलाताई कदम, शाह आलम खान, मंगलाताई पाटील, अण्णासाहेब चित्तेकर, सोपानराव तेलगड, धैर्यशील चव्हाण, प्रा. सुखदेव मांटे, पुष्पाताई चव्हाण यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

शिस्त, वेळेचे नियोजन आणि जनसेवा हेच अजितदादांचे वैशिष्ट्य यावेळी बोलताना आमदार विक्रम काळे म्हणाले की, स्व. अजितदादा पवार हे शिस्तप्रिय, वेळेचे काटेकोर पालन करणारे आणि लोकांची कामे तत्परतेने करणारे नेते होते. त्यांनी दिलेला शब्द आयुष्यभर पाळला आणि जनतेच्या (पान २ वर)

# बालकामगार निर्मूलनासाठी संयुक्त तपासणी मोहिमा राबविणार; पात्र कामगारांना योजनांचा लाभ पोहोचविण्यावर भर

**जालना- प्रतिनिधी**

जिल्ह्यात बालकामगार प्रतिबंध व निर्मूलन मोहिम अधिक प्रभावीपणे राबविणे, बालकांचा शिक्षणाचा हक्क अबाधित राखणे तसेच असंघटित व माथाडी कामगारांना विविध शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आज बाल कामगार संयुक्त कृतीदल समिती, असंघटित कामगारांच्या जिल्हास्तरीय कार्यकारी समिती आणि जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाची संयुक्त बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल



होत्या. बैठकीत बालकामगार (प्रतिषेध व विनियमन) अधिनियम, १९८६ (सुधारित २०१६ ची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासह विविध विभागांमध्ये समन्वय वाढवून संयुक्त तपासणी मोहिमा राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बालकामगारांच्या बचाव, पुनर्वसन, शिक्षण आणि संरक्षणासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे, गॅरेज, वर्कशॉप, दुकाने, औद्योगिक आस्थापना तसेच इतर व्यावसायिक ठिकाणी नियमित संयुक्त तपासण्या घेण्याचे निर्देश दिले. या तपासण्यांद्वारे बालकामगार किंवा किशोरवयीन कामगारांची बेकायदेशीर नियुक्ती होत नसल्याची खात्री करण्याबरोबरच, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर संबंधित कायद्यांनुसार तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. बालकामगार म्हणून आढळणाऱ्या प्रत्येक बालकाच्या शिक्षणाची सातत्याने व्यवस्था, पुनर्वसन आणि संरक्षणासाठी कामगार विभाग, पोलीस विभाग, महिला व बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन, चाईल्ड हेल्पलाईन आणि इतर संबंधित यंत्रणांनी संयुक्त कृती आराखड्यानुसार काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासोबतच बालकामगार प्रथा पूर्णपणे निर्मूलन करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

बैठकीत बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनांचाही आढावा घेण्यात आला. पात्र प्रत्येक बांधकाम कामगारापर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविणे, नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शक ठेवणे आणि बोगस नोंदणी (पान २ वर)

# जालना विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील विजेच्या प्रलंबित प्रश्नांवर मुंबई येथे आढावा बैठक संपन्न

## आ.अर्जुनराव खोतकर यांच्या विविध महत्त्वपूर्ण मागण्या

**मुंबई - प्रतिनिधी**

मुंबई येथील निर्मल भवन येथे ऊर्जा विभागाच्या राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली जालना विधानसभा मतदारसंघासह जालना जिल्ह्यातील ऊर्जा विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांबाबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीस ✻✻शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर✻✻, आमदार हिकमत उधाण, ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जालना शहर, ग्रामीण भाग आणि



संपूर्ण जिल्ह्यातील वीजपुरवठा, नवीन उपकेंद्रे, पायाभूत सुविधा, महावितरणच्या सेवा तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जालना शहरातील वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि सातत्याने वाढणारी वीज मागणी लक्षात घेता जालना शहरात पाचवे वीज उपकेंद्र (सबस्टेशन) तातडीने मंजूर करून उभारण्यात यावे, अशी ठाम मागणी केली. शहरातील सध्याच्या उपकेंद्रांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी हे उपकेंद्र अत्यावश्यक असल्याचे त्यांनी (पान २ वर)

# संपादकीय....


## बालकामगारमुक्त समाजासाठी बैठका नव्हे, कृतीची गरज

जालना जिल्ह्यात बालकामगार निर्मूलन, असंघटित कामगारांचे संरक्षण आणि माथाडी कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली झालेली संयुक्त बैठक ही स्वागतार्ह बाब आहे. विविध विभागांना एकाच व्यासपीठावर आणून समन्वयातून काम करण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला आहे. मात्र, अशा बैठका यशस्वी ठरणार की नाही, हे पुढील काळातील प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून असेल. भारतात बालकामगारांवर बंदी घालणारे कठोर कायदे असतानाही वास्तव वेगळे चित्र दाखवते. शहरातील हॉटेल्स, ढाबे, गॅरेज, वर्कशॉप, चहाच्या टपऱ्या, किरकोळ दुकाने तसेच काही लघुउद्योगांमध्ये आजही अल्पवयीन मुले काम करताना दिसतात. अनेक वेळा दारिद्र्य, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती, शिक्षणातील खंड आणि स्थलांतर ही त्यामागील प्रमुख कारणे असतात. त्यामुळे केवळ छापे मारून किंवा दंडात्मक कारवाई करून हा प्रश्न कायमचा सुटणार नाही. प्रशासनाने संयुक्त तपासणी मोहिमा राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय निश्चितच योग्य आहे; मात्र या मोहिमा केवळ औपचारिक राहू नयेत. तपासणीनंतर सापडलेल्या प्रत्येक बालकामगाराचे पुनर्वसन, शाळेत पुनर्प्रवेश, कुटुंबाला आर्थिक मदत आणि सातत्याने पाठपुरावा झाला तरच या मोहिमेचा खरा परिणाम दिसून येईल. अन्यथा काही दिवसांनी तीच मुले पुन्हा दुसऱ्या ठिकाणी काम करताना दिसतील.

या बैठकीत असंघटित आणि माथाडी कामगारांच्या नोंदणीवरही भर देण्यात आला. ही बाब तितकीच महत्त्वाची आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कामगारांना अपघात विमा, आरोग्य सुविधा, शैक्षणिक मदत, निवृत्तीवेतन किंवा इतर कल्याणकारी योजनांची माहितीच नसते. परिणामी शासनाच्या अनेक योजना कागदावरच राहतात. त्यामुळे नोंदणी वाढविण्याबरोबरच योजनांची माहिती प्रत्यक्ष कामगारांपर्यंत पोहोचविणे ही प्रशासनाची मोठी जबाबदारी आहे.

दुसरीकडे, बोगस नोंदणी रोखण्याच्या सूचनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. पात्र लाभार्थ्यांचा हक्क अबाधित राहावा यासाठी पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पडताळणी व्यवस्था विकसित करणे आवश्यक आहे. योजनांचा लाभ योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचला, तर शासनावरील विश्वासही वाढेल.

बालकामगार निर्मूलन ही केवळ सरकारी यंत्रणांची जबाबदारी नाही. पालक, शिक्षक, उद्योगमालक, व्यापारी संघटना, स्वयंसेवी संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांचीही त्यात तितकीच भूमिका आहे. एखादे मूल शिक्षणाऐवजी काम करताना दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता संबंधित यंत्रणांना माहिती देणे, ही सामाजिक जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले निर्देश निश्चितच सकारात्मक आहेत. परंतु त्याचे यश बैठकीतील निर्णयांमध्ये नसून पुढील काही महिन्यांत किती बालकामगार शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात परतले, किती असंघटित कामगार योजनांशी जोडले गेले आणि किती बेकायदेशीर रोजगारांवर कारवाई झाली, यावर मोजले जाईल. बालपण हे काम करण्यासाठी नसून शिकण्यासाठी, घडण्यासाठी आणि स्वप्ने पाहण्यासाठी असते. त्यामुळे बालकामगारमुक्त जालना हे केवळ घोषवाक्य न राहता वास्तवात उतरविण्यासाठी प्रशासन, समाज आणि उद्योगक्षेत्र या तिन्ही घटकांनी सातत्याने आणि प्रामाणिकपणे एकत्र काम करण्याची हीच योग्य वेळ आहे.



जालना शहरातील आनंदी स्वामी मंदिर येथे आज आनंदी स्वामी महाराजांना विठ्ठलाचे देखणे रूप देण्यात आले.

**छायाचित्र किरण खानापुरे**

### प्रशासकीय इमारतीमध्ये नगर भुमापन कार्यालय कार्यरत

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील नगर भुमापन विषयक सेवा अधिक सुलभ व जलद उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख जालना यांच्या अधिपत्याखाली नवीन नगर भूमापन कार्यालय, जालना येथे सुरु करण्यात आलेले आहे. हे कार्यालय प्रशासकीय इमारत, तळ मजला, जालना येथे कार्यरत झाले आह. दि. १५ जुन, २०२६ पासुन नागरिकांसाठी सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या कार्यालयामार्फत नगर भुमापन, मालमत्ता नोंदी, वारस हक्क नोंदी, नकाशे, मोजणी व इतर संबंधीत कामकाज करण्यात येणार आहेत. नागरिकांनी आपल्या नगर भूमापन विषयक कार्यासाठी प्रशासकीय इमारत, तळ मजला, जालना येथे सुरु झालेल्या नवीन नगर भूमापन जालना कार्यालयाशी संपर्क साधावा.

# पान १ व ४ वरुन...

### राहुल गांधींच्या...

पोहोचतो. राजकीय मतभेद व्यक्त करण्यासाठी लोकशाहीमध्ये अनेक वैधानिक मार्ग उपलब्ध असताना अशा पद्धतीने आंदोलन करणे योग्य नसल्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, ''राहुल गांधी यांनी केलेले आंदोलन हे केवळ प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न असून त्यातून देशात संभ्रम निर्माण करण्याचे राजकारण केले जात आहे. पंतप्रधानांच्या निवासस्थानाचा आणि देशाच्या घटनात्मक संस्थांचा सन्मान राखणे ही सर्व राजकीय पक्षांची जबाबदारी आहे.

यावेळी आंदोलनामध्ये माजी आमदार कैलास गोरंटयाल, जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, नारायण पवार, नगरसेवक अक्षय गोरंटयाल, रमेश गौरक्षक, सखुबाई पणबिसरे, जगदीश भरतिया, नंदकिशोर गरदास, मनोज जोशी, आनंद झारकंडे, संजय पाखरे, कल्याण भदनेकर, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, बाबुराव पवार, नागेश अंभोरे, गोपाल पवार, बापू साळवे, रोहित भूरेवाल, नितीन कानडे, निलेश गोर्डे, कार्तिका मनोज इंगळे, मुकेश चव्हाण, रणजीत बनवारी, राजाराम जाधव, बद्री भसांडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जालना जिल्ह्यातील...

प्रकारची तोडफोड किंवा छेडछाड होणे हे सार्वजनिक हिताला बाधा पोहोचविणारे गंभीर कृत्य असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर दि.२० जुलै रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाइन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस पोलिस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांच्यासह जिल्हास्तर व तालुकास्तरावरील महसूल, कृषी, ग्रामविकास विभागाचे अधिकारी तसेच स्कायमेट कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकी मध्ये स्वयंचलित हवामान केंद्रांशी छेडछाड झालेल्या घटनांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले. छेडछाड करणाऱ्या व्यक्तींची ओळख पटवून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी मित्तल यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी आपल्या परिसरातील स्वयंचलित हवामान केंद्रांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. केंद्रांजवळ कोणतीही संशयास्पद हालचाल, उपकरणांची तोडफोड किंवा छेडछाड आढळल्यास तात्काळ संबंधित तहसील कार्यालय, कृषी विभाग, पोलीस प्रशासन किंवा जिल्हा प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

### एसआयआर अभियानात...

असल्याचे त्यांनी सांगितले.'मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा सर्वात मोठा अधिकार आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीतील आपली माहिती पडताळून आवश्यक त्या दुरुस्ती करून घ्याव्यात. कोणताही पात्र मतदार या प्रक्रियेपासून वंचित राहू नये,'' काही अडचणी असल्यास शिवसेनेने नियुक्त केलेले बि.एल. ए. शासनाने नेमलेल्या सी संपर्क करावा असे आवाहन आ. अर्जुनरावजी खोतकर यांनी केले. मतदारसंघातील सर्व नागरिकांनी निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण () अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे आणि एसआयआर प्रक्रिया पूर्ण करून लोकशाही बळकट करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### अजितदादांच्या...

विश्वासाला कधी तडा जाऊ दिला नाही. राज्याचे नेतृत्व करत असतानाही त्यांनी बारामती आणि काटेवाडीशी असलेले आपले नाते कायम जपले.

ते पुढे म्हणाले की, जालना जिल्ह्यात जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे संघटन प्रभावीपणे कार्यरत आहे. गेल्या तब्बल २२ वर्षांपासून येथे स्व. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आणि आता त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त सातत्याने आरोग्य शिबिरे व विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. महाराष्ट्रात अशा प्रकारचे सातत्याने सामाजिक उपक्रम राबविणारा जालना हा एकमेव जिल्हा असल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

मराठवाड्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी संधी मिळेल तेव्हा अरविंदराव चव्हाण यांना पक्षाकडून अधिक बळ मिळावे यासाठी प्रयत्न करू. समाजसेवेच्या या कार्यात आपण कायम सोबत राहू, असा शब्दही आमदार काळे यांनी दिला.

**राजकारणातील वेगवान आणि प्रभावी नेतृत्व हरपले**

कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांनी आपल्या भाषणात स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याचा भावनिक शब्दांत गौरव केला. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील वेग, प्रशासनावरचा प्रभाव आणि जनतेशी असलेली थेट नाळ तुटल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

अजितदादा हे जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन दिवसाचे १८ तास काम करणारे, प्रशासनावर प्रभावी पकड असलेले आणि प्रचंड लोकसंग्रह असलेले नेतृत्व होते. त्यांनी दिलेल्या प्रेरणेतूनच आजही वाढदिवस, पुण्यतिथी किंवा इतर निमित्ताने समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नाझेर काझी आणि रविकांत राठोड यांनीही स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याचा गौरव करत समाजसेवेचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

**९१० रुग्णांची तपासणी; २७२ शस्त्रक्रियेसाठी निवड**

या आरोग्य शिबिराला परिसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. दिवसभर चाललेल्या शिबिरात ९१० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी २७२ रुग्णांची मोफत नेत्रशस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली, तर ३९५ रुग्णांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

याशिवाय आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत पात्र नागरिकांना मोफत आयुष्यमान भारत कार्डांचे वितरण करण्यात आले. मानेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कार्यरत आरोग्य सेविकांचा भेटवस्तू देऊन विशेष सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमास रिंकल तायड, शितल बारोटे, संतोष ढेंगळे, शेख रज्जाक बागवान, सतीश वाहुळे, विजय सोनवणे, प्रताप शिंदे, डॉ. गोविंद वाघ, विष्णू भुतेकर, पद्माकर हांडे, उमेश मोहिते, किशोर सवडे, ज्ञानेश्वर पडूळ, अनिल सरकटे, भानुदास राठोड, गणेश कावळे, गणेश लोखंडे, गणेश धायडे, किसनराव भुम्बर, देवराव गायकवाड, अशोक भुतेकर, विठ्ठल मोहिते, कृष्णा गाडेकर, संदीप गाडेकर, मुख्तार पठाण, भगवानराव उगले, रामेश्वर उगले, समाधान राठोड, राहुल राठोड, गणेश डुकरे, सिद्धेश्वर शिंदे, शहाजी मस्के, आनंदराव शिंदे, प्रियंका मोरे, दिगंबर लकडे, डॉ. संतोष नाईक, राहुल कळकुंबे, दिलीप क्षीरसागर, गोवर्धन डोंगरे, सतीश ढवळे, भगवान दाभाडे, राम डोंगरे, सरपंच दत्तू कुरधने, अमोल खरात, आप्पासाहेब उगले, गोरख राठोड, आनंद म्हस्के यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरोग्यसेवा आणि समाजहिताचे कार्य हेच स्व. अजितदादा पवार यांना खरी आदरांजली असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. शिबिराच्या माध्यमातून शेकडो रुग्णांना मोफत उपचार, चष्मे आणि शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध झाल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

### बालकामगार निर्मूलनासाठी...

रोखण्यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय महाराष्ट्र माथाडी कामगार अधिनियमांतर्गत मालक नोंदणी आणि कामगार नोंदणीमध्ये वाढ करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. अधिकाधिक पात्र माथाडी व असंरक्षित कामगारांना मंडळाच्या कक्षेत आणून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यावर विशेष भर देण्यात आला.

बैठकीस उपजिल्हाधिकारी (मदत व पुनर्वसन), पोलीस अधीक्षक, जालना, उपआयुक्त, जालना महानगरपालिका, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद जालना, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद जालना, जिल्हा समन्वयक अधिकारी, चाईल्ड हेल्पलाईन, समितीचे सचिव तथा सरकारी कामगार अधिकारी श्री. मकरंद पाटील तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### जालना विधानसभ...

स्पष्ट केले. तसेच जालना शहरातील विविध भागांमध्ये वारंवार होणारा विस्कळीत वीजपुरवठा, कमी दाबाची समस्या आणि नागरिकांना होणारा त्रास याकडे त्यांनी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे लक्ष वेधले. शहरातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. जिल्ह्यातील आरोग्य सेवांचा विचार करता शासकीय तसेच खासगी रुग्णालयांना २४ तास अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध करून त्यांच्या वीजपुरवठ्याला विशेष प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी आमदार खोतकर यांनी केली. आरोग्य सेवा कोणत्याही परिस्थितीत विस्कळीत होऊ नयेत, यासाठी स्वतंत्र नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. याशिवाय अंबड रोड परिसरात १३२ केव्ही क्षमतेचे नवीन सबस्टेशन प्रस्तावित करून तातडीने मंजूर करण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी त्यांनी केली. या उपकेंद्रामुळे जालना शहर व परिसरातील वाढत्या वीज मागणीची पूर्तता होण्यास मोठी मदत होईल, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी सामनगाव, गुंडेवाडी आणि तलाव सावंगी येथे प्रस्तावित ३३ के.व्ही. वीज उपकेंद्रांचे काम तातडीने हाती घेण्यात यावे, अशीही महत्त्वपूर्ण मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी बैठकीत केली. या उपकेंद्रांमुळे संबंधित गावांसह परिसरातील वीजपुरवठा अधिक सुरळीत, दर्जेदार व विश्वासार्ह होईल, असे त्यांनी नमूद केले. तसेच जालना विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात गरजेनुसार विविध ठिकाणी नवीन वीज उपकेंद्रे मंजूर करून उभारण्यात यावीत, अशी मागणीही त्यांनी केली. त्यामुळे शेतकरी, ग्रामस्थ, कृषीपंपधारक आणि ग्रामीण उद्योगांना दर्जेदार व सुरळीत वीजपुरवठा मिळेल, असे त्यांनी सांगितले. नागरिकांची वाढती संख्या आणि महावितरणच्या कामकाजावरील वाढता ताण लक्षात घेता **जालना शहरात महावितरणचे नवीन शाखा कार्यालय सुरू करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली. नवीन शाखा कार्यालय सुरू झाल्यास ग्राहकांच्या विविध कामांचा वेग वाढेल आणि तक्रारींचे तातडीने निवारण होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी स्मार्ट मीटरची सक्ती करण्यात येऊ नये**, अशी स्पष्ट भूमिका आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मांडली. तसेच वीजबिलांबाबत नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींचे तातडीने निवारण करून ग्राहकांना दिलासा देण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणीही त्यांनी ऊर्जा विभागाकडे केली. बैठकीदरम्यान ऊर्जा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील विविध प्रलंबित कामांचा आढावा सादर केला. त्यानंतर राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मांडलेल्या सर्व मागण्यांची सकारात्मक दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक प्रस्ताव तातडीने तयार करून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच जालना विधानसभा मतदारसंघासह जालना जिल्ह्यातील ऊर्जा विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्नांना प्राधान्य देत त्यांचा नियमित पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, ऍडव्होकेट सुनील किंनगावकर, डॉ. संजय राख यांच्यासह ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी व संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

### परतूरमध्ये जनसेवेचा...

गोरे, नितीन राठोड, विक्रम उफाड, संपत टकले, शहाजी राक्षे, सुरेश सरोदे, जिजाबाई जाधव, डॉ. प्रदीप हुसे, डॉ. बळीराम बागल, डॉ. कृष्णा कोरडे, तहसीलदार सुमन मोरे, प्रभारी तहसीलदार लक्ष्मीकांत खळेकर, गटविकास अधिकारी विनय पवार, गटविकास अधिकारी कौशल पाटील, तालुका कृषी अधिकारी श्रीशा साळवे, दयानंद वाघमोडे, विष्णू राठोड, स्टेट बँक ऑफ इंडिया चे मॅनेजर विजय राम, परतुर नगरपालिकेचे मुख्याधिकारी दीपक इंगोले, उमेद बचत गटाचे संदीप दाभाडे, गटशिक्षणाधिकारी दत्ता क्षीरसागर, अशोक घुगे यांच्यासह हजारो लाभार्थी यावेळी उपस्थित होते.

### लोकनेते स्व. अजितदादा...

वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविण्यात आले.

दुपारी १२.०० वाजता स्नेहांकुर अनाथ आश्रम येथे अनाथ व निराधार बालकांना अन्नदान करण्यात आले. बालकांसोबत प्रेमाने संवाद साधत त्यांना भोजन देण्यात आले. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी, मानवता आणि सेवाभावाचा सुंदर संदेश समाजापर्यंत पोहोचला.

यावेळी नितीन जेथलिया यांनी सांगितले की, ''समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी सातत्याने कार्य करणे, हीच लोकनेत्यांच्या विचारांना खरी अभिवादनाची भावना आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून त्यांच्या कार्याचा आदर्श पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.''

या सर्व उपक्रमांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब गाडगे, इंद्रजित घनवट, शहराध्यक्ष प्रमोद जगताप, नगरसेवक बाबुराव हिवाळे, राजेश खंडेलवाल, शाकेर खतीब, मंगेश डहाळे, वसीम सय्यद, सिद्धू अंभुरे, दत्ता अंभुरे, गणेश ढवळे, विष्णुपंथ तनपुरे, शाकेरभाई मापेगावकर, अनिल आंबेकर, कम्मू पठाण, मोसीन बागवान, उबाळे, मुजमुले, सुरेश भंडारी, कांतराव सोळंके, बद्रीभाऊ खवणे, डॉ. केशरखाने, संकेत अंभुरे, अजीम पठाण, विशाल पवार, रफिक कुरेशी, सोनू धुमाळ, सौरभ अंभुरे, राहुल अंभुरे, एकनाथ बोनगे, विठ्ठल राऊत, शोएब सिद्दीकी, सचिन बोंबले, अमोल अंभुरे तसेच पक्षाचे अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, उत्साहपूर्ण आणि सेवाभावी वातावरणात पार पडला. समाजहिताचे उपक्रम हेच लोकनेत्यांना खरी आदरांजली असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या उपक्रमांमुळे परतूर शहरात सामाजिक ऐक्य, सेवाभाव आणि पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश पोहोचला.

### जालना येथे ...

लॉगिन करावे. त्यानंतर जागेवर निवड संधी (२०२५-२६) प्लेसमेंट ड्राईव्ह ३ या बटनावर क्लिक करून जालना जिल्हाची निवड करावी. उद्योजक / नियोक्तानिहाय त्यांच्याकडील रिक्त पदांसाठी अर्ज करावा. मुलाखतीसाठी बायोडाटा किमान दोन प्रती सोबत ठेवून शुक्रवार, दि. २४ जुलै, २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, जिल्हाधिकारी कार्यालय दुसरा मजला, जालना येथे उपस्थित रहावे असे आवाहन सहायक आयुक्त, ककौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, गणेश चिमणकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ...

व्यवस्थेत तातडीने सुधारणा व्हावी, यासाठी सोनम वांगचुक दिल्लीमध्ये आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या या न्याय्य लढ्याला बळ देण्यासाठी आणि लाखो विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी टेंभुर्णीतील नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले. तहसीलदारांमार्फत सरकारला निवेदन आंदोलकांच्या वतीने सरकारला पाठवण्यासाठी एक जाहीर मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. ''पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कडक कारवाई व्हावी, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेतला जावा आणि सोनम वांगचुक यांच्या मागण्यांवर सरकारने त्वरित तोडगा काढावा, अन्यथा भविष्यात हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल,'' असा इशारा टेंभुर्णी ग्रामस्थांच्या वतीने या वेळी देण्यात आला.

### टेंभुर्णी परिसरात...

साकडे घातल्यानंतर शेतकरी पावसाची वाट पाहत होता. ''. आज पाऊस आल्याने जीवात जीव आला. आता पीक जगेल ही आशा वाटते. शेतकऱ्यांसाठी शासनाने तोच उपाययोजना केल्या पाहिजे. मे जून जुलै या महिन्यामध्ये शेतकऱ्यांसाठी अनुदानाची रक्कम खात्यावर शासनाने दिली पाहिजे ही सर्व बळीराजांची मागणी आहे ती शासनाने ऐकली पाहिजे. किरण ची शेती जगली तरच शेतकरी व इतरांचे जगणे सोयीस्कर होईल.

**- संतोष आवटी शेतकरी**

__ आधार मिळाला आहे. नुकतीच उगवलेली सोयाबीन आणि कपाशीची रोपे तजेलदार झाली आहेत. जमिनीत ओल टिकून राहणार असल्याने खते व औषध फवारणीची कामे

**दुबार पेरणी टळली**

''गेल्या पंधरा दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने दुबार पेरणीचे संकट ओढवले होते. परंतु दोन दिवसापासून रिमझिम पावसामुळे हे दुबार पेरणीचे संकट टळले आहे, तरी पाऊस दमदार झाला पाहिजे या आशेवर शेतकरी जगत आहे.

बळीराजाची शेती पावसावरच अवलंबून असल्याने, बळीराजाचे सर्व व्यवहार शेतीवरच असल्याने तो चिंतेत तर आहे.

**- शेतकरी टेंभुर्णी**

### वारकऱ्यांची सेवा....

आहे. सेवाभाव, समर्पण आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम असलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. याबाबत डॉ. अभिजित सपकाळ म्हणाले, ''वारकऱ्यांची सेवा हीच आमच्यासाठी विठ्ठलाची सेवा आहे.

गेली १७ वर्षे रेड स्वस्तिक सोसायटीच्या माध्यमातून आम्ही ही सेवा निःस्वार्थ भावनेने करत आहोत. पालखीतील प्रत्येक वारकरी सुरक्षित आणि निरोगी राहावा, हा आमचा एकमेव उद्देश आहे. समाजाच्या सहकार्यामुळे ही सेवा अधिक प्रभावीपणे राबविता येत असून, भविष्यातही ही परंपरा अखंड सुरू ठेवण्याचा आमचा निर्धार आहे. भक्ती, सेवा आणि मानवतेचा संगम असलेल्या या उपक्रमामुळे डॉ. अभिजित सपकाळ आणि त्यांच्या संपूर्ण वैद्यकीय पथकावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत असून, वारकऱ्यांच्या सेवेसाठी त्यांनी जपलेली १७ वर्षांची अखंड परंपरा समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### वरुड बु. येथील...

ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.ग्रामपंचायत पातळीवर पारदर्शकता व भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. या पुरस्कारामुळे संपूर्ण भोकरदन तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. गावकरी, सहकारी व सामाजिक संघटनांनी तसेच बोरशे गुरुजी,महजादखान,जनार्दन सोळंके,नारायण सोन्नी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# विश्वासराव रणसिंग महाविद्यालयात स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती साजरी

**इंदापूर - गणेश धनवडे**

इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब ता. इंदापूर महाविद्यालयात स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती अभिवादन व स्मरण कार्यक्रमाने साजरी करण्यात आली. संस्था सचिव विरसिंह रणसिंग यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी विनम्र अभिवादन केले.



कार्यक्रमात संस्थेचे सचिव विरसिंह रणसिंग यांनी स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या कर्तृत्वपूर्ण नेतृत्वाचा विशेष उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, अजितदादा हे विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणारे, निर्णयक्षम, शिस्तप्रिय आणि कणखर नेतृत्व होते. सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्यासाठी ते नेहमीच कटिबद्ध राहिले. त्यांच्या कार्यपद्धतीत वेळेचे नियोजन, प्रशासनावरील पकड आणि विकासकामांबाबतची तळमळ स्पष्टपणे दिसून येत होती.

रणसिंग म्हणाले, ''अजितदादा हे केवळ राजकीय नेते नव्हते, तर सामान्य माणसाचा आधारवड होते. त्यांच्या कार्यातून नव्या पिढीने शिस्त, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेची प्रेरणा घ्यावी.''

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अशोक काळंगे,उपप्राचार्य ज्ञानेश्वर गुळीग ,उपप्राचार्य डॉ.प्रशांत शिंदे इ मान्यवर व प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात दि. २५ जुलै, २०२६ रोजी देवशयनी आषाढी एकादशी, दि. २९ जुलै,२०२६ रोजी गुरुपौर्णिमा, दि. १ ऑगस्ट,२०२६ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयेंती इत्यादी जयंती, सण, उत्सव साजरे होणार आहेत. तसेच राज्यातून विविध ठिकाणावरुन यात्रेसाठी पायी दिंड्या जालना जिल्ह्यातुन मार्गक्रमण करत आहेत. सण, उत्सव, जयंती यांनिमित्त जिल्ह्यात शहरात मिरवणुका व विविध कार्यक्रम आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असतात. तसेच सध्या महाराष्ट्रात व देशभरता आरक्षण उपवर्गीकरणाला तिव्र विरोध होत आहे. तसेच सध्या मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण व धनगर आरक्षण मिळावे या अनुषंगाने जालना जिल्ह्यात विविध आंदोलनात्मक कार्यक्रम सुरु आहेत. तसेच सध्या महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या सत्ताधारी व विरोधकात एकमेकांविरुध्द विविध कारणावरुन आरोप प्रत्यारोप सुरु आहे. तसेच शेतक-यांचे विविध मागणीसाठी विविध संघटनांकडून आत्मदहन, उपोषण, धरणे, मोर्चे, निदर्शने, रास्तारोको इत्यादी सर्व प्रकारची आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संपुर्ण जिल्ह्यासाठी दि. २३ जुलै, २०२६ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि. ५ ऑगस्ट,२०२६ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश अप्पर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी जारी केले आहे.

पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही. तर पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही.

तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही. हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि. २३ जुलै, २०२६ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि. ५ ऑगस्ट,२०२६ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# अहिल्यादेवी प्राथमिक विद्यालयात रंगला विठूनामाचा गजरः नयनरम्य दिंडी सोहळा साजरा!



**दत्ता देशमुख**

अहिल्यादेवी प्राथमिक विद्यालयात आषाढी एकादशीचे औचित्य साधून आपल्या शाळेत अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात 'दिंडी सोहळा' साजरा करण्यात आला. संपूर्ण शाळा परिसर ''विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'' आणि ''ज्ञानबा तुकाराम'' च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

सकाळी सर्व विद्यार्थी पारंपारिक पोषाखात शाळेत उपस्थित झाले होते. मुलांनी पांढरा कुर्ता-पायजमा आणि डोक्यावर गांधी टोपी/पटकरा परिधान केला होता, तर मुली नऊवारी आणि पार्क-पोलक्यात नटल्या होत्या. काहींनी हातात टाळ, चिपळ्या तर काहींनी खांद्यावर भगवी पताका घेतली होती. लहान बालकांनी साकारलेली विठ्ठल-रुक्मिणीची रूपे सर्वांचेच लक्ष वेधून घेत होती.

दिंडी सोहळ्यासाठी संस्थेचे सचिव श्री दिनेश येवले साहेब व अध्यक्ष श्रीमती शोभाताई येवले तसेच शिवनगर प्रभागाचे नगरसेवक श्री शशिकांत घुगे कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते विठुरायाची आरती करण्यात आली व कार्यक्रमानंतर सर्व बालगोपाळांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# टेंभुर्णी येथून जवळच असलेल्या कुंभारझरीच्या पंढरपूर दिंडीचे विठ्ठल रुक्मिणी देवस्थान कडून प्रथमच शिस्तीचे निरीक्षण

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथून जवळच असलेल्या कुंभारझरी येथील वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठानच्या वतीने निघणाऱ्या स्वग्राम कुंभारझरी ते पंढरपूर या पायी दिंडीचे पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी देवस्थानतर्फे कौतुक करण्यात आले. या दिंडीला देवस्थानच्या विश्वस्त मंडळाने मंगळवारी पाष्टा (जि. धाराशिव) या ठिकाणी भेट देऊन दिंडीचे निरीक्षण केले. या विश्वस्त मंडळात शिवाजी महाराज मोरे, प्रकाश महाराज जंजाळ, माधवी निगडे आदींचा समावेश होता.

१२वर्षांपासून स्वग्राम ते पंढरपूर ही पायी दिंडी निघते.

यावेळी दिंडीतील महिला व पुरुषांचा गणवेश, शिस्तबद्ध प्रवास, अभंग गायन, कीर्तन सेवा, पर्यावरणपूरक कार्य, प्लास्टिक निर्मूलन आदी सेवा पाहून विश्वस्त मंडळ भारावून गेले. दरवर्षी पंढरपूरला जाणाऱ्या दिंड्यांपैकी तीन आदर्श दिंड्यांना पंढरपूर देवस्थानतर्फे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विशेष बक्षीस दरम्यान, जालना जिल्ह्यातील देऊन गौरविले जाते. स्वग्राम ते पंढरपूर या दिंडीचे प्रथमच या पुरस्कारासाठी निरीक्षण केले गेल्याने वारकऱ्याच्या उत्साहाला उधाण आले आहे.

यावेळी विश्वस्त मंडळातील सर्व सदस्यांचा दिंडीचे प्रमुख सोनुने गुरुजी यांच्या उपस्थितीत हृद्य सत्कार करण्यात आला. यावेळी दिंडीतील वारकरी शालिकराम म्हस्के, भगवान महाराज गायकवाड, भगवान चव्हाण, सुनील वायाळ, माजी सरपंच लक्ष्मण शिंदे आदींसह वारकरी महिला व पुरुषांची उपस्थिती होती.

कुंभारझरी येथील ह.भ.प. सोनुने गुरुजी यांच्या पुढाकाराने मागील बारा वर्षापासून स्वग्राम ते पंढरपूर ही पायी दिंडी निघते. या दिंडीत सहभागी वारकऱ्यांना विशेष गणवेशात यावे लागते. पुरुष वारकऱ्यांना पांढरा ड्रेस, टोपी तर महिला वारकऱ्यांना केसरी साडी असा ड्रेस कोड ठरवण्यात आला आहे.

–

**जाफराबाद तालुक्याच्या टेंभुर्णी परिसरातील सोनवणे महाराज यांच्या दिंडीचे विठ्ठल रुक्मिणी देवस्थान कडून निरीक्षण करून कौतुक करण्यात आले. जाफराबाद तालुक्यातील कुंभारझडींच्या या दिंडीचे वारकरी संप्रदाय उत्कृष्ट दिंडी म्हणून जेव्हा गौरवण्यात येते तेव्हा जाफराबाद तालुक्याचा अभिमान असा हा क्षण आहे. जाफराबाद तालुका भक्तिमय मार्गामध्ये पुढारलेला आहे. विविध धार्मिक अध्यात्मिक क्षेत्रामध्ये जाफराबाद तालुका मागे नाही. तसेच वारकरी संप्रदाय महाराष्ट्र मध्येच नव्हे तर देशांमध्ये जगामध्ये सुद्धा या संप्रदायाला मान आहे. या संप्रदायाच्या दिंडीचा कौतुक सोहळा होतो आहे. विठ्ठल रुक्मिणी संस्थांचे विश्वस्तांनी निरीक्षण केले म्हणजेच पुरस्कार मिळाल्यासारखंच आहे. तो आमच्या टेंभुर्णी जवळ कुंभार जरीचा मान नसून संपूर्ण जाफराबाद तालुक्याचा मान आहे.**

**ह. भ. प. रघुराम कोरडे महाराज टेंभुर्णीकर तालुका जाफराबाद जिल्हा जालना.**

# पंढरीची वाट पावलांनी नाही, तर मनाने चालायचा प्रवास -आदिनाथ सपकाळ

**दत्ता देशमुख**

प्रत्येक रस्त्याला एक शेवट असतो; पण पंढरीच्या वाटेला शेवट नसतो. कारण ती वाट पंढरपूरच्या मंदिरात जाऊन थांबत नाही, तर माणसाच्या अंतः करणात जाऊन कायमची वस्ती करते. ती केवळ पायांनी चालली जात नाही, तर श्रद्धा, समर्पण आणि प्रेमाने जगली जाते.

पहाटेच्या दवबिंदूंना साक्षी ठेवून पहिले पाऊल पडते तेव्हा चालायला निघतो तो देह असतो; पण काही अंतर कापल्यानंतर चालू लागते ती आत्म्याची ओढ असते. वाटेवरची धूळ अंगावर बसते, आणि मनावरचा अहंकार त्या धुळीत विरघळून जातो. म्हणूनच वारकरी पंढरपूरला पोहोचण्याआधीच स्वतःला शोधून काढतो.

वारीत कुणी मोठा नसतो, कुणी लहान नसतो; कुणी श्रीमंत नसतो, कुणी गरीब नसतो. प्रत्येकाच्या पावलांचा आवाज



वेगळा असला, तरी नामाचा नाद एकच असतो ''राम कृष्ण हरी... विठ्ठल विठ्ठल...!'' एका हातात टाळ, दुसऱ्या हातात भगवा आणि हृदयात विठ्ठल हीच वारकऱ्याची खरी श्रीमंती. वाटेत भेटणारा प्रत्येक जीव ''माऊली'' होतो. कारण नाती रक्ताने नव्हे, तर भक्ती, प्रेम आणि समतेने जुळतात.

पंढरीची वाट माणसाला शिकवते की आयुष्याचा खरा प्रवास अंतर मोजण्यात नसतो, तर मन किती निर्मळ, विचार किती पवित्र आणि हृदय किती प्रेमळ आहे, यामध्ये असतो. ज्या पायांना फोड येतात, त्याच पावलांना विठ्ठलाच्या दर्शनाचा आनंद सर्वाधिक गोड लागतो. ज्या डोळ्यांत भक्तीचा ओलावा असतो, त्यांनाच विटेवर उभा असलेला सावळा पांडुरंग दिसतो. चंद्रभागेच्या पाण्यात शरीर शुद्ध होते; पण वारीच्या अनुभवात मन, विचार आणि जीवन शुद्ध होत जाते. जसा एखाद्या पदार्थाची चव खाल्ल्याशिवाय कळत नाही, तसाच वारीचा आनंद चालल्याशिवाय समजत नाही. म्हणून पंढरीची वारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून ती संस्कारांची विद्यापीठ, समतेची पताका, प्रेमाची अखंड परंपरा आणि मानवतेचा जिवंत उत्सव आहे.

वारी शिकवते की देव शोधण्यासाठी डोंगर-दऱ्या पालथ्या घालण्याची गरज नाही; माणसामाणसांत प्रेम, करुणा आणि सेवाभाव जपला, तर प्रत्येक हृदयात विठ्ठल भेटतो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांचा वारसा जपणारी ही परंपरा आजही लाखो वारकऱ्यांच्या पावलांतून अखंड प्रवाही आहे.

वारी संपते तेव्हा पाय घरी परततात; पण मन मात्र पुन्हा आषाढाची वाट पाहत राहते. कारण पंढरीची वाट एकदा अंतःकरणात उतरली की ती आयुष्यभर चालत राहते. तेव्हाच उमगते की, वारी ही पंढरपूरपर्यंतचा प्रवास नसून स्वतः च्या आत्म्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे.

म्हणूनच संतांनी सांगितले आहे ''आयुष्यात एकदा तरी पंढरीची वारी करावी; कारण त्या एका वारीत जीवनाचा खरा अर्थ सापडतो.''

होय होय वारकरी... डोळा पाहे रे पंढरी...

राम कृष्ण हरी... जय जय राम कृष्ण हरी...!

# जिल्हाधिकारी कार्यालयात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी शशीकांत हदगल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, मनिषा देशपांडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी नायब तहसिलदार तुषार निकम, सतीश तायडे, निलम लुनावत, संतोषी सुर्यवंशी, संध्या सुखदेवे महसुल सहाय्यक दिपाली राऊत (वानखडे), शिल्पा मगरे, रुपा येंगुपटला, संपदा कुलकर्णी, ए.बी. राठोड, जे.एस. बारवकर, अतुल केदार, रविंद्र मगरे, रवि हेलगट, संतोष खरात, विठ्ठल बोरकर, सविता भोकरे, रीना नगरकर, सुनिल काळुंके व इतर तसेच प्रशासकीय इमारतीमधील विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# भोकरदन येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर उत्साहात

## हजारो नागरिकांच्या विविध प्रशासकीय प्रश्नांचा जागीच निपटारा

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या वतीने भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा मतदारसंघासाठी आज (दि. २२) आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान समृद्धी लॉन्स, सिल्लोड रोड, भोकरदन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून, महसूल व इतर शासकीय विभागांशी संबंधित शेकडो अर्ज व तक्रारींचा जागीच निपटारा करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून शासनाच्या विविध सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत एकाच ठिकाणी पोहोचाव्यात, प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान व्हावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार संतोष पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, उपविभागीय अधिकारी तथा मुख्य नोडल अधिकारी सुकेशिनी कांबळे-पगारे, तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे (भोकरदन), तहसीलदार अविनाश लोंढे (जाफ्राबाद) यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार संतोष पाटील दानवे म्हणाले की, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना एकाच छताखाली विविध शासकीय योजनांचा लाभ, दाखले व प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी हे महसूल समाधान शिबीर अत्यंत उपयुक्त ठरले आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचत असून प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होत आहे.''

जिल्हाधिकारी अशिमा मित्तल आणि उपविभागीय अधिकारी सुकेशिनी कांबळे-पगारे यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. विविध विभागांमधील उत्तम समन्वयामुळे नागरिकांना तातडीने सेवा उपलब्ध करून देणे शक्य झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शिबिरात महसूल विभाग, भूमी अभिलेख, कृषी, पंचायत राज, आरोग्य, ग्रामीण विकास, अन्न व नागरी पुरवठा, बँक, सामाजिक न्याय, पशुसंवर्धन आदी विभागांचे स्वतंत्र सेवा कक्ष उभारण्यात आले होते. प्रत्येक विभागामार्फत नागरिकांच्या विविध समस्यांवर तत्काळ कार्यवाही करून आवश्यक सेवा आणि लाभ उपलब्ध करून देण्यात आले.

महसूल व भूमी अभिलेख विभागामार्फत जिवंत ७/१२ मोहीम, ई-फेरफार, वारस नोंदी, कौटुंबिक वाटणीपत्र नोंदी तसेच प्रलंबित फेरफार प्रकरणांचा जागीच निपटारा करण्यात आला. पात्र निवासी अतिक्रमणांचे नियमितीकरण, गावठाण स्वामित्व सनद वाटप, महिलांचे नाव ७/१२ उताऱ्यावर भोगवटादार म्हणून समाविष्ट करण्याची कार्यवाही तसेच महिला शेतकरी दाखल्यांचे वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते अभियानांतर्गत प्रलंबित शेतरस्त्यांबाबतही आवश्यक मंजुरीपत्रे देण्यात आली.

अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत नवीन डिजिटल शिधापत्रिकांचे वितरण, शिधापत्रिकांमधील दुरुस्ती अर्जांचा निपटारा करण्यात आला. तसेच उत्पन्न, रहिवासी व इतर शैक्षणिक प्रमाणपत्रे, नवीन मतदार नोंदणीसह विविध नागरिक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

आरोग्य विभागाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी, आयुष्मान भारत कार्ड नोंदणी व वितरण करण्यात आले. संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्रांचे वितरण करण्यात आले. जलतारा उपक्रम, वृक्षारोपण जनजागृती तसेच महिला बचत गटांसाठी विविध शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शनही देण्यात आले.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी तहसील कार्यालय भोकरदन व जाफ्राबाद, पंचायत समिती तसेच विविध शासकीय विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिरात हजारो नागरिकांनी सहभाग घेत विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला आणि समाधान व्यक्त केले.

# परतूरमध्ये जनसेवेचा महासंगम; समाधान शिबिरातून ६,०६१ लाभार्थ्यांना थेट लाभ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा; ५७१ रक्तदाते, ३,२७५ रुग्णांची तपासणी, ११,५०० पीआर कार्ड, महिला बचत गटांना ₹४.२३ कोटींचे कर्जवाटप

**परतूर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर राबविण्यात येत असलेल्या सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत परतूर येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान२०२६ मोठ्या उत्साहात पार पडले. आमदार बबनराव लोणीकर यांच्या पुढाकारातून गजानन लॉन्स येथे झालेल्या या भव्य शिबिरात केंद्र व राज्य शासनाच्या १५ विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध करून देत ६,०६१ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमात हजारो नागरिकांनी सहभाग घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित स्नेहभोजनात सुमारे ४ हजार नागरिकांनी सहभोजनाचा आनंद घेतला. आमदार बबनराव लोणीकर यांनी स्वतः पंगतीत फिरून महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी व लाभार्थी यांची विचारपूस करत भोजन वाढून सेवा केली. कार्यक्रमात बोलताना आमदार



लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विकासाची नवी दिशा घेतल्याचे सांगितले. रस्ते, पाणी, वीज, उद्योग, रोजगार, कायदा-सुव्यवस्था आणि पायाभूत सुविधांमध्ये झालेल्या कामगिरीमुळे विविध राष्ट्रीय सर्वेक्षणांमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांना देशातील आघाडीच्या मुख्यमंत्र्यांमध्ये तिसरे स्थान मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. शेतकरी व नागरिकांसाठी विविध योजनांचा लाभ शिबिरात ११ हजार ५०० पीआर कार्डांचे वितरण, ९०० आयुष्मान भारत गोल्डन कार्ड, ६८ महिला बचत गटांना ₹४ कोटी २३ लाखांचे कर्जवाटप, तसेच ६९५ महिलांना लाभ देण्यात आला. कृषी विभागामार्फत ३,३०० शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ, तर २७ घरकुल लाभार्थ्यांना धनादेश व परवानग्या देण्यात आल्या. याशिवाय १७० दिव्यांग लाभार्थ्यांना ₹२.५० लाखांचा लाभ, २८ सफाई कामगारांना सुरक्षा साहित्य, तसेच ५७१ लाभार्थ्यांना संजय गांधी निराधारसह विविध योजनांचा लाभ वितरित करण्यात आला. परतूर व मंठा तालुक्यातील दहावी-बारावीतील २८९ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



**५७१ रक्तदाते, ३,२७५ रुग्णांची तपासणी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित महारक्तदान शिबिरात ५७१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राहुल लोणीकर यांनी सलग २६ व्या वेळेस रक्तदान करून युवकांसमोर आदर्श निर्माण केला.

सर्वरोग निदान आरोग्य शिबिरात ३,२७५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. सर्व रुग्णांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. जालना येथील दीपक हॉस्पिटलने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या सहकार्याने कर्करोग निदानाबाबत मार्गदर्शन केले. डॉ. प्रदीप हूसे, डॉ. बळीराम बागल, डॉ. कृष्णा कोरडे यांच्यासह तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने सेवा दिली.

**शेतकरी हिताचे निर्णय मांडले**

कार्यक्रमात आमदार लोणीकर यांनी शेतकरी हितासाठी राज्य शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांचा आढावा घेतला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी ₹३६,५८५ कोटींची तरतूद, जालना जिल्ह्यासाठी ₹२,१०० कोटींचा निधी, तसेच ₹४८ हजार कोटींच्या वीजबिल माफीचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपधारक ४६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

**१,००० वृक्ष लागवडीचा संकल्प**

सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने १,००० वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला. साईबाबा मंदिर परिसरात आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून उपक्रमाची सुरुवात झाली. पर्यावरण संवर्धन आणि हरित महाराष्ट्राचा संदेश देणारा हा उपक्रम पुढील दोन दिवसांत मतदारसंघभर राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

कार्यक्रमाला सभापती राहुल लोणीकर, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, उपविभागीय अधिकारी परतुर पद्माकर गायकवाड, उपविभागीय अधिकारी जालना रामदास दौंड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर राजेंद्र पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री रेंगे, अंकुशराव अवचार, बाबुराव शहाणे, शत्रुघ्न कणसे, प्रियांका राक्षे, संदीपभैया *(पान २ वर)*

# लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त परतूरमध्ये विविध सामाजिक उपक्रम उत्साहात संपन्न

## नितीन जेथलिया यांच्या पुढाकारातून रुग्णांना फळे व ब्लँकेट वाटप, वृक्षारोपण तसेच अनाथ बालकांना अन्नदान

**परतूर - प्रतिनिधी**

लोकनेते तथा महाराष्ट्राच्या राजकारणात जनसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे दिवंगत नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त परतूर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. नितीन जेथलिया यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांना पक्षाचे पदाधिकारी,



कार्यकर्ते व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १०.०० वाजता सरकारी दवाखाना, परतूर येथे करण्यात आली. यावेळी उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. त्याचबरोबर रुग्णालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यानंतर सकाळी ११.०० वाजता दृष्टी लॉयन्स, परतूर येथे रुग्णांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. गरजू व उपचाराधीन रुग्णांना आवश्यक वस्तूंचे *(पान २ वर)*

# जालना येथे ‘जागेवर निवड संधी’ प्लेसमेंट ड्राईव्हचे २४ जुलै रोजी आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

नोकरीच्या शोधात असलेल्या जालना जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी आणि मार्गदर्शन उपलब्ध करण्याच्या उद्देशाने रोजगार स्वयंरोजगारसहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. यानुसार जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे मार्फत शुक्रवार, दि. २४ जुलै, २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, जिल्हाधिकारी कार्यालय दुसरा मजला,जालना येथे प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन सकाळी ११ ते २ दरम्यान करण्यात आले आहे. याकरिता गरवारे हायटेक प्रा. लि. छत्रपती संभाजी नगर यांचे दहावी, बारावी, पदवीधर उत्तीर्ण युवक-युवती करिता अप्रेंटिसचे १० पदे, तसेच अजित सीड्स प्रा. लि. छत्रपती संभाजी नगरचे दहावी, बारावी, पदवीधर उत्तीर्ण युवक-युवती उत्तीर्ण करिता अप्रेंटिसचे १० पदे, त्याचप्रमाणे स्वामी विवेकानंद नागरी सह पतसंस्था मर्या,जालना यांची कोणतीही पदवी उत्तीर्ण तसेच एम.बी.ए. मार्केटिंग पदवीधर यांची मार्केटिंग एक्झिक्युटिव्हसाठी १५ पदे अशी एकूण ३५ रिक्त पदे प्राप्त झाली आहेत. यामध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने मध्ये देखील प्रशिक्षणासाठी काही पदे भरण्यात येणार आहेत. याकरीता नोकरी इच्छुक पात्रताधारक उपस्थित होणाऱ्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध होणार आहे .जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहितीसाठी विभागाच्या

www. cmy
kpy.mahaswayam.gov.in
त्याच प्रमाणे केंद्र शासनाच्या
www.ncs.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होमपेज वरील नोकरी साधक ( ) लॉगिन मधून आपल्या युजर आयडी व पासवर्डच्याआधारे *(पान २ वर)*

# नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ आणि सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ टेंभुर्णी कडकडीत बंद शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**दत्ता देशमुख**

देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलणाऱ्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाचा तीव्र निषेध करण्यासाठी आणि दिल्लीत आंदोलनाला बसलेले प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या लढ्याला जाहीर पाठिंबा देण्यासाठी आज टेंभुर्णी शहर कडकडीत बंद पाळण्यात आले. ग्रामस्थांनी आणि स्थानिक व्यापारी संघटनांनी पुकारलेल्या या गाव बंदच्या हाकेला संपूर्ण गावातून १०० टक्के उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासूनच टेंभुर्णीतील मुख्य बाजारपेठ, सर्व लहान-मोठी दुकाने,



हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या आणि व्यापाऱ्यांनी स्वतःहून बंद ठेवली. वैद्यकीय सेवा आणि औषधांची दुकाने यांसारख्या अत्यावश्यक सेवा वगळता गावात सर्वत्र कडकडीत बंद पाळण्यात आला. नेहमी गजबजणाऱ्या मुख्य चौकांमध्ये आज पूर्णपणे शुकशुकाट पाहायला मिळाला.शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्या मंत्र्यांनी राजीनामा द्यावा!नीट परीक्षेमधील प्रचंड गैरव्यवहार आणि पेपरफुटीमुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी आपल्या पदाचा तातडीने राजीनामा दिला पाहिजे, अशी आक्रमक मागणी टेंभुर्णीकरांनी केली. आहे या भ्रष्ट *(पान २ वर)*

# टेंभुर्णी परिसरात रिमझिम पाऊस; पिकांना मिळाले जीवदान

## दुबार पेरणीचे संकट टळल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण; खते आणि औषध फवारणीची कामे मार्गी लागणार

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी कृषी मंडळ परिसरात आज सकाळपासूनच रिमझिम पावसाने हजेरी लावली आहे. पावसाअभावी करपण्याच्या मार्गावर असलेल्या पिकांना यामुळे जीवदान मिळाले असून, परिसरातील शेतकऱ्यांना

**मोठा दिलासा मिळाला आहे.**

गेल्या आठवड्यापासून ढग जमा होऊनही पाऊस पडत नसल्याने कपाशी, सोयाबीन, तूर आणि मका ही पिके संकटात सापडली होती. मात्र, आज पहाटेपासून आकाशात काळे ढग दाटून आले आणि सकाळी आठच्या सुमारास हलक्या सरी कोसळल्या.



दुपारपर्यंत हा रिमझिम पाऊस अधूनमधून सुरू होता. पावसाच्या आगमनाने वातावरणात गारवा निर्माण झाला असून, शेतकरी कोळपणीसह इतर शेतीकामांसाठी पुन्हा सज्ज झाले आहेत.

जमिनीत ओल नसल्याने रखडलेली पेरणी आणि दुबार पेरणीच्या भीतीने चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना या पावसामुळे मोठा मार्गी लागणार आहेत. हवामान विभागाने पुढील दोन-तीन दिवस हलका ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवल्याने शेतकऱ्यांची चिंता दूर झाली आहे.

**_ पावसाने आम्हाला तारले**

‘‘सोन्याचे दागिने गहाण ठेवून शेतात पेरणी केली होती. विहिरीत पाणी नसल्याने दुबार पेरणीच्या चिंतेत असताना सोमवारी व मंगळवारी आलेल्या रिमझिम पावसाने आम्हाला तारले.‘‘

**ऐक शेतकरी**

विठुरायाला *(पान २ वर)*

# वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा डॉ. अभिजित सपकाळ यांची पंढरपूर वारीत १७ वर्षांची अखंड आरोग्यसेवा

## रेड स्वस्तिक सोसायटीच्या सहकार्याने १९ दिवस मोफत वैद्यकीय सेवा; १० लाख रुपयांच्या औषधांचे वाटप

**दत्ता देशमुख**

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या श्रद्धेचा, भक्तीचा आणि सेवाभावाचा महासागर. लाखो वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी पैठण ते पंढरपूर असा पायी प्रवास करतात. या लाखो भाविकांच्या आरोग्याची जबाबदारी निःस्वार्थ भावनेने सांभाळत डॉ. अभिजित सपकाळ यांनी सलग १७ वर्षे वैद्यकीय सेवा देण्याची उल्लेखनीय परंपरा कायम राखली आहे. रेड स्वस्तिक सोसायटीच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या आरोग्य सेवा उपक्रमांतर्गत



वारकऱ्यांना मोफत आरोग्य तपासणी, प्रथमोपचार, औषधोपचार, आवश्यक वैद्यकीय सल्ला तसेच आपत्कालीन आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जाते. पालखी मार्गावरील हजारो वारकऱ्यांना वेळेवर उपचार मिळत असल्याने हा उपक्रम वारकरी संप्रदायासाठी मोठा आधार ठरत आहे. यंदाही आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पैठण ते पंढरपूर या संपूर्ण पालखी मार्गावर १९ दिवस अखंड आरोग्य सेवा देण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे १० लाख रुपयांच्या औषधांचे मोफत वाटप करण्यात येत असून, विविध आजारांवरील उपचार, आपत्कालीन वैद्यकीय मदत आणि आरोग्य मार्गदर्शन दिले जात आहे. या सेवाकार्यात डॉ. अभिजित सपकाळ यांच्यासह डॉ. विवेक अधिकार, गणेश कुलकर्णी, डॉ. मंगेश सपकाळ, विजय पवार तसेच इतर सहकारी डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. पालखी मार्गावरील विविध ठिकाणी वैद्यकीय पथक सतत कार्यरत राहून वारकऱ्यांना आवश्यक आरोग्यसेवा पुरवत आहे. गेल्या १७ वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या सेवेमुळे हजारो वारकऱ्यांना वेळेवर उपचार मिळाले असून, अनेकांना गंभीर आरोग्य समस्यांमधूनही दिलासा मिळाला *(पान २ वर)*

# वरुड बु. येथील श्री. विश्वासराव वाघ यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार - २०२६ जाहीर

**दत्ता देशमुख**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा २०२६ हा यशवंत सेना, अहिल्यानगर आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०४/०९/२०२६ रोजी संपन्न झाला.

या सोहळ्यात भोकरदन तालुक्यातील वरुड बु. येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. विश्वासराव संपतराव वाघ यांना त्यांच्या उल्लेखनीय समाजसेवेबद्दल ‘‘राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार -



२०२६‘‘ देऊन सन्मानित करण्यात आले. वाघ हे गेल्या अनेक वर्षांपासून सत्य, समता आणि न्याय या मूल्यांसाठी कार्यरत आहेत. राजर्षी शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा प्रसार करून लोकशाही, धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा व सामाजिक समतेसाठी *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.